# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## POSITIVE STORIES

---

### दिनांक 26.12.2018 ते 25.01.2019

### दिनांक 26.12.2018 बुधवार

**1) पो.स्टे. धंतोली पोलीसांची कामगिरी :**

दिनांक 16.12.18 रोजी अंदाजे 0100 वा ते 0120 वा दरम्यान बालभारती ऑफिसच्या समोर, धंतोली गार्डन जवळ, नागपूर येथे टिप्पर गाडी क्र. एमएच/31/सीक्यु/2629 यात मोठया प्रमाणात दारू साठा जात असल्याच्या माहितीवरून सदर गाडीची स्टाफसह थांबविली असता सदर गाडीचा ड्रायव्हर अंधराचा फायदा घेवुन पळून गेला. यावरून बेकायदेशिर रित्या विना परवाना टिप्परमध्ये दारूचा साठा मिळुन आला म्हणुन टिप्पर गाडी चालकाविरूध्द अप.क्र. 334/18 कलम 65(अ),(ड),83(ब) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयात खालीप्रमाणे जप्त करण्यात आला.

1) 197 पेटया देशी दारूच्या असा एकुण 5,12,200 रू चा मुद्येमाल 2) आयबीच्या 5 पेटया असा 33,600 रू चा मुद्येमाल 3) पांढ–या हिरव्या रंगाचा टाटा कंपनीचा टिप्पर क्र. एमएच/31/सीक्यु/2629 कि. 16,50,000 रू असा एकुण 21,95,800 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. 2, नागपूर शहर श्री. चिन्मय पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि दिनेश एम. शेन्डे, पोउपनि केवडतकर, सपोउपनि तिवारी, पोहवा पंढरी, नापोशि मनोज, पोशि राजेश, गोपाल, हेमराज यांनी केली आहे.

**दिनांक 28.12.2018 शुक्रवार**

**1) गुन्हे शाखा, युनिट क्र. 2 पोलीसांची कामगिरी :**

गुन्हे शाखा, युनिट क्र. 2, चे अधिकारी व कर्मचारी यांना गुप्तबातमीदाराकडुन प्राप्त माहितीचे आधारे पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत राहणारा इसम मोहम्मद शरिफ उर्फ साहिल उर्फ पापा मोहम्मद रफिक, वय 33 वर्ष रा. सुगत नगर, आर्य नगर, कॉलनी, प्लॉट नं. 87, पो.स्टे. जरीपटका, नागपूर त्याचे राहते घरात अग्नि शस्त्र व सु–या सारखे शस्त्र बाळगुण आहे. माहिती ची खातर जमा केली असता, नमुद इसमाचे राहते घराचे घरझडती दरम्यान 1) दोन सुरे एक बनावटी लोखंडी स्टिलची सिल्वर रंगाचे पॉलीस असलेली पिस्टल मॅगझिनसह पिस्टल चे बॅरलवर इंग्रंजीमध्ये MADE IN JARMANI असे कोरलेले, पाच जिवंत काडतुस, एक वापरलेल्या काडतुसची खाली पुंगळी असा एकुण 60,600 रू मिळुन आल्याने पोलीस ठाणे जरीपटका येथे नमुद आरोपी विरूध्द भारतीय हत्यार कायद्याचे कलम 3/25, 4/25 सहकलम 135 मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कार्यवाही ही पोलीस उपआयुक्त,(गुन्हे) श्री. संभाजी कदम, सपोआ श्री. संजीव कांबळे, पोनि ए.आय. मुद्‌गल यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि डी.ओ. पेंडकर, पोहवा प्रकाश वानखेडे, रविंद्र गावंडे, विजय लेकुरवाडे, नापोशि सतिश पांडे, बलजिसिंह ठाकुर, महेश कुंरसुंगे, पोशि सयद वाहीद, श्याम गोरले, चालक पोशि अश्विन पिल्लेवान यांनी केली आहे.

## दिनांक 29.12.2018 शनिवार

### 1) पो.स्टे. सक्करदरा पोलीसांची कामगिरी :

दिनांक 29.12.2018 रोजी मा. पोलीस आयुक्त, साहेब, नागपूर शहर यांचे आदेशान्वये संपुर्ण नागपूर शहरात राबविण्यात आलेल्या ऑपरेशन क्रॅक डाउन दरम्यान पो.स्टे. सक्करदरा आरसीसी नं. 43/1989 कलम 324,323,34 भादंवि यांची जाहीरनामा न्यायालयालीन पेशी तारिख 24. 01.2019 असलेबाबत प्राप्त जाहीरनाम्यानुसार फरार आरोपी रमेश गोविंदराव टेकाम, वय 52 वर्ष रा. जुनी बिडिपेठ, हनुमान मंदिराजवळ गोविंदराव नेवारेचे घराशेजारी स्वतःचे घर पो.स्टे. सक्करदरा नागपूर याचे मुळ पत्यावर जावून व आजु बाजुला चौकशी करून तसेच न्यायालयीन केसबाबत समक्ष माहिती प्राप्त करून पुढील चौकशी करण्यात आली. चौकशी करून तसेच न्यायालयीन केसबाबत समक्ष माहिती प्राप्त करून पुढी चौकशी करण्यात आली चौकशीत निष्पन्न झलेला नविन पत्ता जुनी बिडिपेठ, हनुमान मंदिराजवळ गोविंदराव नेवारेचे घराशेजारी स्वतःचे घर पो.स्टे. सक्करदरा नागपूर असे त्याचे स्वतःचे घराबाबत माहिती घेवून त्यास नमुद गुन्हयाबाबत व त्यांचे इतर सहआरोपी बाबत पो.स्टे. सक्करदरा फरार/पाहिजे शोध पथ प्रमुख पोहवा विलास चोबितकर, यांनी पोशि पवन यांचे सह मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनात काम करत दिर्घ काळापासुन पो.टे. भिलेखावर फरार असलेले आरोपी यांचा अथक परिश्रम घेत आले बुध्दी कौशल्याचा वापर करून चौकश्शी करण्यात आली. नमुद आरोपीतांचा शोध करता आरोपी मिळून आला. त्यांचे सोबतचे इतर दोन सहआरोपी हे मृत्यू पावले असल्याबाबतची त्याने आम्हास माहिती कळविली नमुद आरोपीबाबत शासकीय व निमशासकीय ओळखपत्र 1) आधार कार्ड 2) राशन कार्ड 3) एस.एन.डी एल. चे इलेक्ट्रिक बिल प्राप्त कयन त्यांची चौकशी करता आमची खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेवून कायदेशिर प्रक्रिया करून मा. न्यायलया समक्ष हजर करण्यात येत आहे.

सदर कारवाई मा. पोलीस उपआयुक्त, चिन्मय पंडित अतिरिक्त, कार्यभार परि.क्र. 4, नागपूर यांचे मार्गदर्शनात सक्करदरा पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. संदिपान पवार, पोनि गुन्हे श्री. सुनिल चव्हण, सपोनि श्री. उल्हास भुसार, पोहवा विलास चोबीतकर, पोशि पवन लांबट यांनी कारवाई केली.

## दिनांक 30.12.2018 रविवार

### 1) पो.स्टे. धंतोली पोलीसांची कामगिरी :

दिनांक 16.12.2018 रोजी चे अंदाजे 0100 वा ते 0120 वा च्या दरम्यान बालभारती ऑफिसच्या समोर, धंतोली गार्डन जवळ नागपूर येथे टिप्पर गाडी क्र. एमएच/31/सीक्यु/2629 यात मोठया प्रमाणात दारू साठा जप्त असल्याचा माहितीवरून सदरची गाडी स्टाफसह थांबविली असता सदर गाडीचा ड्रायव्हर अंधाराचो फायदा घेवून पळून गेला. म्हणुन टिप्पर गाउी चालकाविरूध्द अप.क्र. 334/18 कलम 65(अ),(ड),83,(ब) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन 197 पेटया देशी दारू असा 5,12,200 रू चा मुद्येमल आयबी च्या 5 पेटया असा 33,600 रू चा मुद्येमाल, पांढ–या हिरव्या रंगाचा टाटा कंपीनीचा टिप्पर 16,50,000 रू असा एकुण 21,95,800 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील पुढील तपासकामी आरोपी क्र. 1) प्रशांत सुरेश जयस्वाल, वय 47 वर्ष 2) मुन्ना उर्फ संजित सुरेश जयस्वाल, वय 49 वर्ष 3) अमरेश सुरेश जयस्वाल, वय 46

वर्ष रा. प्लॉट नं. 14/सी, छायाविला बलराज मार्ग धंतोली, नागपूर यांना आज दिनांक 30.12.2018 रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. 2, श्री. चिन्मय पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि दिनेश एम.शेंन्डे, पोउपनि वडतकर, सपोउपनि तिवारी, पोशि देवेद्र, राजेश,अजय, हेमराज, नापोशि राजेद्र, पोहवा पंढरी, यांनी पार पाडली आहे

<u>दिनांक 01.01.2019 मंगळवार</u>

<u>1) पो.स्टे. मानकापूर पोलीसांची कामगीरी –</u>

दिनांक 28.12.18 रोजी पो.स्टे. मानकापूर अंतर्गत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे सुरजनगर पलोटी स्कुलचे मागे या भागात गुन्हेगार व संशयीत चेकींग करत असतांना सायंकाळी 1700 वा चे सुमारास दोन इसम एका दुचाकीवर संशयीतरित्या फिरतांना दिसून आले पोलीसांना पाहुन ते पळून जावू लागले त्याचा पाठलाग करून दुचाकी चालकास पकडले व मागे बसलेला इसम पळून गेला. पकडलेल्या इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव मोहम्मद शबान मोहम्मद वकील, वय 19 वर्ष, रा. अंसारनगर, मोमीनपुरा, लाल बिल्डींग जवळ, नागपूर त्याचे विरूध्द पो.स्टे. सिताबर्डी येथे तिन वर्षापुर्वी मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे व ते तेथे चोरी करण्याचे उद्देशाने रेखी करण्यासाठी आले असल्याचे त्याने सांगीतल्याने त्याचेकडे अधिक तपास करण्यासाठी त्यास अटक केली असता त्याने 1) पो.स्टे. मानकापूर येथे अप क्र. 337/18 कलम 454,457,380 भदंवि, 2) पो.स्टे. मानकापूर अप क्र. 373/18 कलम 379 भादंवि, 3) पो.स्टे. मानकापूर येथे अप क्र. 319/18 कलम 454,457,380 भादंवि, 4) पो.स्टे. कळमना अप क्र. 786/18 कलम 454,380 भादंवि हे गुन्हे केल्याचे कबूल केले. सदर आरोपी हे सराईत घरफोडी करणारे गुन्हेगार असून त्यांचा तपास चालु आहे तपासादरम्यान त्यांचे कडून 01 एलएडी टिव्ही, दुचाकी, ॲक्टीवा, हिरो होंडा पॅशन व रोख रक्कम असा एकुण 1,40,000 रू चा मुद्येमाल जप्त करून करून गुन्हे उघडकीस आनले.सदर आरोपीकडून आणखी चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची व चोरीस गेलेला माल मिळण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, परि क्र. 2, श्री चिन्मय पंडीत, सपोआ श्री विजय मराठे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री महेश चव्हाण, सपोनि गजेंद्र राऊत, पोहवा रवि भुजाडे, नापोशि अरूण चिखले, अंकूश राठोड, राजेश कोकाटे, पोशि अजय पाटील, रोशन वाडीभस्मे यांनी केली.




<u>दिनांक 02.01.2019 बुधवार</u>

**2) गुन्हे शाखा, युनिट क्र. 3 पोलीसांची कामगिरी :**

04/12/2018 चे 23:00 वा. ते दि. 05/12/2018 चे 06:30 वा. दरम्यान फिर्यादी राजेद्र सदाशिव धकाते, वय 42 वर्ष रा. तांडापेठ, नवी वस्ती, पाचपावली, नागपूर यांनी आपली मोटार सायकल पॅशन प्रो क्र. MH-49-K./1255 किं. 30,000/– रूपये ब्लॅक ग्रे रंगाची घरासमोर पार्कींग करून ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पाचपावली येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, नागपुर शहर करीत असताना पेट्रोलिंग दरम्यान यातील 1) संतोष उर्फ कुबडया मुलचंद अहिरवार, वय 46 वर्षे रा. ग्राम लखनी, पोस्ट बरोदा पो.स्टे. मोतीनगर, ता.जि.सागर, (मध्यप्रदेश) ह.मु. हिवरी ले आउट, पो.स्टे. नंदनवन नागपूर, 2) कलीराम कन्छेदीलाल श्रीवास, वय 45 वर्षे रा. इकलहरा, वार्ड नं. 15, खेलनगर, ता.परासिया पो.स्टे. चांदामेठा, जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश) ह.मु. विजयनगर, उज्जैन रोड, पो.स्टे. विजयनगर, इंदोर (मध्यप्रदेश) हे मध्यप्रदेश सतलापुर पो.स्टे. चे गुन्हयातील चोरीचे एक 10 चक्का टाटा 2515 ट्रक क्र. MP-09-HF-2777 किं.अ. 16,00,000/– रूपये ट्रकसह तसेच चोरी करण्याकरीता वापरलेले साहित्याह हिवरी नगर चौक ते भिम चौक दरम्यान रोडवरून ताब्यात घेवून त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे सांगीतल्यावरून अटक करण्यात आली. आरोपींचे पीसीआर घेवून अधिक तपास केला असता दोन्ही आरोपीतांनी मध्यप्रदेश मधील रायसेन जिल्हयाचे पो.स्टे. औद्योगिक क्षेत्र सतलापुर हद्दीतून 06 ट्रक व सागर शहरातून 01 ट्रक असे 07 ट्रक चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपी हे रेकॉर्डवरील कुख्यात आंतरराज्यीय वाहन चोर असून त्यांचेविरूध्द नागपूर शहर व मध्यप्रदेश राज्यात वाहन चोरी व चोरीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. दोन्ही आरोपीतांना अटक करून त्यांचेकडून मध्यप्रदेश राज्यातील ट्रक चोरीचे 7 व नागपूर शहरातील वाहनचोरी व वाहनातील बॅटरी चोरीचे 6 गुन्हे (पाचपावली–1, जरीपटका–3, गणेशपेठ–1 व बजाजनगर–1) असे एकुण 13 गुन्हे उघडकीस आणून एकुण 16,87,,300/– रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी कलीराम श्रीवास कुख्यात आंतरराज्यीय ट्रक चोर असून तो सतत फरार असल्याने मध्यप्रदेश चे सतलापूर पोलीसांकडून त्यास वांटेड म्हणून घोषीत करून त्याचे बाबत माहिती देणाऱ्यांना 5000/— रू. चे बक्षीस जाहीर केले होते.

तसेच संतोष उर्फ कुबडया अहिरवार हा नागपूर शहर तसेच मध्यप्रदेश राज्यातील कुख्यात गुन्हेगार असून त्यास यापुर्वी जानेवारी 2014 मध्ये त्याचे अन्य साथीदारासह वाहन चोरीचे गुन्हयात अटक करून त्याचेकडून 04 चारचाकी वाहन भोपाळ मध्यप्रदेश येथून जप्त करण्यात आले होते.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. संभाजी कदम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जगवेंद्रसिंग राजपुत, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, मपोउपनि मंगला मोकाशे, सपोउपनि राजेंद्र बघेल, पोहवा शत्रृघ्न कडू, शैलेष ठवरे, अनिल दुबे, सुरेश हिंगणेकर नापोशि श्याम कडू, अतुल दवंडे, फिरोज शेख व शरीफ शेख गुन्हे शाखा, युनिट 3, नागपूर अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.



<u>दिनांक 04.01.2019 शुक्रवार</u>

<u>1) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी –</u>

दिनांक 03/01/2019 मिळालेल्या विश्वसनीय बातमीवरून बुध्दनगर, बुध्दपार्क युनिट नं.1, पो.स्टे.पाचपावली नागपुर येथे जुगार रेड कार्यवाही केली असता, कार्यवाही दरम्यान 1) बल्जींदर सींग उर्फ बब्लु हरजींदर सींग मुलतानी वय 48 वर्ष रा. गुरूतेग बहादुर नगर, जरिपटका नागपूर, 2) रजत गजानन बोरकर वय 22 वर्ष रा. बौध्दनगर पाचपावली नागपूर, 3) सुरज परमजीतसिंग शामकरिया वय 22 वर्ष रा. कपीलनगर, जरिपटका नागपूर, 4) प्रमोद उर्फ पंकज यामराव सावरकर, वय 22 वर्ष रा. राणीदुर्गावती चौक, यषोधरा नगर नागपुर असे सांगीतले त्याचे जवळुन व डावावरून 1)जुगाराचे 52 तासपत्ते 2) नगदी 2140/रू 3) चार मोबाईल एकुन कि.14500/रू, तसेच घटनास्थळावरून 4) चार टु–व्हीलर वाहन एकुण किं.अं. 2,15,000/रू असा **एकुण किं.अं. 2,31,640/रू चा मुद्देमाल** मिळुन आल्याने जप्त करण्यात आले. आरोपी इसमांवर कलम 12 महा. जु.कायदा प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा. चिंतामण डाखोळे, नापोशि/रविशंकर मिश्रा, सुनिल वानखडे, राजेश देशमुख, विलास चव्हाण, राकेश तिवारी, विनोद बर्डे, दिपक सराटे, विकास सिंग, यांनी केलेली आहे.

<u>3) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगिरी :</u>

पोलीस स्टेशन पाचपावली येथील अपराध क्रं. 04/2019 कलम 379 भा.दं.वि. दाखल झाला असुन नमुद गुन्हयाची हकिकत अशी की, दि. 02/01/19 रोजी 1930 वा सुमारास कमाल चौक, शनिचरा बाजार, मयुर चिकन सेंटरचे बाजुला असलेल्या भाजीपाल्याच्या दुकानाचे समोरुन यातील फिर्यादी हे भाजीपाला घेणे करिता नमुद घटनास्थळी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे पॅन्टचे खिश्यातुन जीओनी कंपनीचा ए – 1 प्लस मॉडलचा IMEI NO- 1 1) 864720030515553 2) 864720030915555 असा कि. 17,999/रु. चा चोरुन नेला अश्या फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.

दि. 03.01.19 रोजी पाचपावली डिबी पथक हे पो.स्टे. पेट्रोलिंग करित असतांना शैतान चौक, वैशालीनगर, पाचपावली, नागपुर येथे एक ईसम संशयास्पद स्थितीत मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ताबाबत विचारणा केली असता त्याने आपले नाव शाहीद अहमद वल्द शकील अहमद अंसारी, वय 32 वर्षे रा. डोबी नगर तहसिल, नागपुर असे सांगितल्याने त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याने अंगात घातलेल्या पॅन्टच्या खिश्यातुन एक जीओनी कंपनीचा बंद मोबाईल मिळुन आल्याने त्यास नमुद मोबाईलबाबत विचारणा केली असता त्याने दि.02/01/19 रोजी 19/30 वा.सु. कमाल चौक, शनिचराबाजार, मयुर चिकन सेंटरचे बाजुला असलेल्या भाजीपाल्याच्या दुकानाचे समोरुन एका ईसमाच्या पॅन्टच्या खिश्यातुन चोरी केल्याबाबत सांगितल्याने पो.स्टे.ला फोन करुन विचारणा केली असता वर नमुद गुन्हा दाखल असल्याबाबत माहीती मिळाल्याने त्यास पो.स्टे.ला आणुन सदर गुन्हयात अटक करुन तपासा दरम्यान अधिक विचारणा केली असता त्याने नागपुर शहरातील वेगवेगळया बाजारातुन 1) एक सिल्व्हर रंगाचा OPPO/ 0700 कं. मोबाईल कि. 6500/रु. 2) एक पांढ–या रंगाचा SAMSUNG कं. कि. 5000/रु. 3) एक काळया रंगाचा GIONEE कं. मोबाईल कि. 10500/रु. 4) एक SAMSUNG कं. कि. 4500/रु. 5) एक MI da-NOTE 4 मॉडेलचा मोबाईल कि. अ. 12000/रु. 6) एक SAMSUNG da- DUOS 4G मॉडेलचा मोबाईल कि. 6500/रु. 7) एक GIONEE कं. मोबाईल कि.7000/रु. 8) एक LENOVO da-मोबाईल कि. 8000/रु. असे एकुण 8 मोबाईल कि.अं. 60,000/रु. व 9) जीओनी कंपनीचा ए – 1 प्लस कि.अं. 17,999/रु. असा एकुण 77,999/रु. चा मुददेमाल जप्त करण्यात आले.

सदरची कारवाई मा.पोलीस उपआयुक्त, श्री राहुल माकणीकर, सपोआ. वालचंद्र मुंढे, वपोनि अशोक मेश्राम यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि.व्ही.एम.धोंगडे, पोहवा राजु अवस्थी, नापोशी विजय लांडे, गजानन निशीतकर, पोशि सचिन सोनवाने यांनी केली.

<u>3) पो.स्टे. शांतीनगर पोलीसांची कामगिरी :</u>

पो.स्टे. शांतीनगर, येथे आम्ही स.फौ. घनश्याम तिवारी, पो.स्टे.शांतीनगर, नागपुर शहर दि.03/01/19 रोजी 09:00ते 21:00 वा. पर्यंत दिवसपाळी तपासपथक अधिकारी म्हणुन डयुटीवर असतांना. सोबत स्टाफ नापोशि अश्विन, प्रकाश, पो.शि.वसिम, सह पो.स्टे हददीत पेट्रो वाहनाने पेटोलिग करीत असतांना 18.00 वा. इतवारी दहीबाजार पुलाखाली विश्वसनिय गुप्त बातमीदारांदवारे सोनु वय अं.22 वर्षे रा.बंगाली पंजा इतवारी रेल्वे स्टेशन जवळील आय.डब्लु क्वार्टर समोर शस्त्र घेवुन शिवीगाळ व धुमधाम करून लोकांना धमकवित आहे अश्या माहितीवरून आम्ही व सोबत स्टॉफ 18.15 वा. इतवारी रेल्वे स्टेशन जवळील आय.डब्लु क्वार्टर पो.स्टे शांतीनगर येथे पोहचलो असता एक इसम लोकांना धमकावुन शिवीगाळ व धुमधाम करतांना दिसुन आले त्यांस स्टॉफ च्या मदतीने ताब्यात घेवुन निशस्त्र करण्यात आले. त्यांचे नावं व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नांव शेख सोनु उर्फ आरिफ वल्द सैय्यद शराफत वय 22 वर्षे रा.बंगाली लालदरवाजा किराणा दुकान पोस्टे पांचपावली नागपुर असे सांगितले त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या उजव्या पॅन्ट च्या खिश्यात खोचुन ठेवलेला एक लोखंडी चाकु ज्यांची लांबी 14 इंच व रूंदी 2 इंच कि.अं.50/–रू असा घटनास्थळ जप्त पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला. तसेच पो.स्टे ला आणुन त्या इसमांचे पो.

स्टे पांचपावली येथील गुन्हे अभिलेखाची पाहणी केली असता मा.पोलीस उप–आयुक्त साहेब परिमंडळ क्र.03 नागपुर शहर यांचे हददपार आदेश क्र.07/18 दि.17/04/2018 प्रमाणे नागपुर शहर व नागपुर जिल्हयातुन एक वर्षा करीता हददपार असल्यांचे निर्देशनात आले. व सदर आरोपीनी सार्वजनिक ठिकाणी चाकु घेवुन धुमधाम करीत असतांना समक्ष मिळुन आल्यांने मा.गृहखात म.रा. मंत्रालय मुंबई यांचे शस्त्र बाळगणे बाबत अधिसुचना तसेच सह.पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे कलम 37(1),(3)मनाई आदेशांचे उल्लघंन केल्यांने तसेच नागपुर शहर व नागपुर जिल्हातुन 1 वर्षा करीता हददपार असुन त्यांने शासनाची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता नागपुर शहरात विनापरवानगी ने वावरतांना मिळुन आल्यांने त्यांच्या विरूध्द 4+25 भाहका सह कलम 135,142 म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.व सदर आरोपी कडुन अप.क्र.118/18 क.324,34 भादवि चा गुन्हा उघडकीस आणण्यात आला.

सदरची कारवाई मा. श्री.राहुल माकणीकर, पोलीस उप–आयुक्त परि–3,नागपुर शहर मा. श्री.वालचंद पी. मुंढे सहायक पोलीस आयुक्त, श्री मुख्तार शेख, वरीष्ठ पोलीस निरीक्षक पो.स्टे. शांतीनगर यांचे मार्गदर्शनाखाली स.फौ.घनश्याम तिवारी, नापोशि अश्विन, प्रकाश, पो.शि. वसिम अधिकारी व कर्मचारी यांनी केली.

## <u>दिनांक 05.1.2019 शनिवार</u>

## <u>(ईतर)</u>

### <u>1) पो.स्टे. कोराडी पोलीसांची कामगिरी :</u>

दि. 04/01/2019 चे 23/00 वा. दरम्यान. कोराडी नाक्या समोर नागपूर सावनेर हॉयवे रोड वरिल फरस पुलाच्या सुरूवातीला चढावावर, हॉटेल हेवन्स चे विरूध्द बाजूस पो.स्टे.कोराडीयातील हर्ष लक्ष्मण नानवाणी वय 20 वर्ष रा. प्लॉट नं. 67, निर्मल कॉलोनी, नारा रोड, सेजल भाटीया यांचे घरी किरायाने, पो.स्टे.जरिपटका नागपूर हा त्याचे ताब्यातील चार चाकी वाहन मारूती सुझुकी रिट्झ क्रं. एम. एच. 49/बी. 9718 मध्ये अवैध्यरित्या बिनापरवाना वर नमूद वर्णनाचा दारूचा मुददेमाल विक्रीच्या उददेषाने वाहून नेताना समक्ष मिळाला त्यास नमूद मुददेमाला बाबत परवाना विचारला असता त्याचे कडे नमूद मुददेमालाबाबत कोणत्याही प्रकारचा परवाना व वाहनाचे कादगपत्र नसल्याने त्याचे जवळून 1) पाच बॉक्स मध्ये 90 एम.एल. क्षमतेचे Officer's Choice Prestige Whisky इंग्रजी दारूचे प्रति बॉक्स 95 बॉटल प्रमाणे एकुण 475 सिलबंद बॉटल प्रत्येकी 65/– रू दराने एकुण 30,875/– रू ची दारू 2) एका बॉक्स मध्ये 180 एम.एल. क्षमतेची बॉटल मध्ये Officer's Choice BLUE Pure Grain Whisky इंग्रजी दारूचे एकुण 47 सिलबंद बॉटल प्रत्येकी 160/– रू दराने एकुण किंमती 7,520/– रू ची दारू 3) एक चार चाकी वाहन मारूती सुझुकी रिट्झ कं. एम.एच. 49/बी. 9718 किंमती 3,50,000/– रू असा एकूण 3,88,395/– रू. चा मुददेमाल घटनास्थळ जप्ती पंचनाम्या प्रमाणे पंचा समक्ष जप्त करुन नमूद आरोपी विरुध्द कलम 65 (ई)(अ) महा. दारुबंदी कायदा सह कलम 130(1)(2)(3) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यास नमूद गुन्हयात कायदेशीररित्या अटक करण्यात आली.




**3) पो.स्टे. अजनी पोलीसांची कामगिरी :आधुनिक तंत्रज्ञानाचे मदतीने किंमती 46,82,287 ॲल्युमिनीयम फाईल अफरातफरी करणा—या टोळीचा 48 तासाचे आत छळा लावुन संपुर्ण मुद्येमाल हस्तगत केल्याबाबत.**

'हिडांल्को इंन्डस्ट्रीज' लि.मी. मध्ये ऑर्डर प्रमाणे विविध गेज नुसार ॲल्युमिनीयम फॉईलची निर्मीती केली जाते. 'आयएफसी. इंटरनॅशनल फ्रेट कार्पोरेशन' 77, ऐव्हरग्रिन एव्हेन्यू, ब्रुक लिन न्युयार्क यु.एस.ए करीता 15698 टन ॲल्युमिनीयम फॉईलचा आर्डर कंपनीस मिळाला होता. आर्डर नुसार 'हिडांल्को इंन्डस्ट्रीज' लि.मी. मध्ये माल तयार करण्यात आला. आर्डर नुसार 21 बॉक्स, ॲल्युमिनीयम फॉईल मालाचे एकुण नेटवेट 15698 किलो किंमती रुपये 46,82,287/— दिनांक 14/12/2018 रोजी रात्री 10.20 वाजता ट्रेलर न. एचआर 55—पी 3833 चे वर ओओसीएल कंपनीचा कंटनेर मध्ये करुन CONCOR नरेंद्रनगर नागपूर येथे जाण्यास पाठवीला होता. दिनांक 19/12/2018 रोजी कस्टम विभागाकडून कंटनेर ची पडताळणी करत असतांना कंपनी कडून लावण्यात आलेले सिल मशीन मध्ये रिड होत नसल्यामुळे संशयावरुन रितसर प्रक्रीये अंतर्गत कंपनीचे सिल तोडून कंटेनर उघडून बघीतले असता कंटेनर मध्ये ॲल्युमिनीयम फॉईल नसुन त्यात रेतीच्या बो—या आढळून आल्या. ट्रेलर चा चालक नामे सर्वतीकुमार पांडे याने विश्वासघात करुन आपल्या आर्थीक फायदया करीता मालाचा अपहार केला आहे. याप्रकरणी फिर्यादी राकेश रामप्रेम गुप्ता, वय 38 वर्ष, व्यवसाय वित्त विभागात व्यवस्थाक, 'हिडांल्को इंन्डस्ट्रीज' लि.मी व्हिलेज डहाली, रामटेक रोड, मौदा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करुन तातडीने गतीमान तपासास सुरुवात करण्यात आली.

माल घेवून येणारा ट्रेलर हा दिनांक 14/12/2018 रोजी रात्री 22.20 वाजता 'हिडांल्को इंन्डस्ट्रीज' लि.मी. मौदा येथून निघाल्या नंतर त्याने 2 तासाचे आत कटेनर डेपो, नरेंद्रनगर येथे पोहचणे अपेक्षीत होते. परंतू तो दिनांक 15/12/2018 रोजी सकाळी 09.00 वाजता पोहचला. तो तंब्बल 9 तास उशीरा पोहचला म्हणून सी.ओसी. कॅमेरांची पाहणी करण्यात आली. एच.बी. टाउन येथील सी.ओ.सी. कॅमेरांचे फुटेजमध्ये नमुद मालाचा कंटेनर दिनांक 14/12/2018 चे 23.30 वाजता सुमारस डावे वळण घेण्याऐवजी उजवे वळन घेवून कळमणा मार्केट मार्गे ऑटोमोटीव्ह चौकातून कामठीचे दिशेने जातांना आढळून आला. हा आधार घेवून तपासास सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर पुढील खाजगी कॅमेरांचा आधार घेवून ट्रेलरचा मार्ग शोधण्यात आला. खसाळा ते खैरी परीसरातील माल ठेवलेल्या गोडावूनचा 24 तासाचे आत शोध लावण्यात आला. गोडावून परीसरात सदर गुन्हयातील ॲल्युमिनीयम फॉईलचे 2 बॉक्स टिनपत्राचे खाली लपवून ठेवलेले मिळून आले. त्याप्रमाणे आरोपींनी कंटेनर मध्ये भरलेल्या रेतीच्या बो–या सुध्दा त्या ठिकाणी मिळून आल्या होत्या. त्यावरुन आरोपीने सदर ठिकाणी माल उतरवल्याचे व तेथून दुस–या वाहनामध्ये माल हलवील्याचे दिसून आले.

गोपणीय माहितीचे आधारे ट्रेलरचा चालक सर्वतीकुमार पांडे यास ज्या आरोपीतांनी फितुर केले त्यांची नावे निष्पन्न करण्यात आले. ते रायपुर येथे राज्य छत्तीसगड येथे गेलेले असल्याची माहिती मिळाल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी तपास पथक तयार करुन पाठवीण्यात आले होते. परंतू आरोपीतांना चाहूल लागल्याने ते हॉटेलमधून पळून गेले होते.

उर्वरीत मुद्देमाला बाबत तपास केला असता एका ट्रान्सपोर्ट कंपनी मार्फत मुद्देमाल विक्रीसाठी दिल्ली येथे पाठविल्याची माहिती प्राप्त झाल्याने तपासपथक दिल्ली येथे पाठवीण्यात आले. त्यांनी सेक्टर क्र. 4, बी ब्लॉक, बवाना इन्डस्ट्रीयल एरीया, दिल्ली येथून 19 ॲल्युमिनीयम फॉईल चे बंडल जप्त करुन ताब्यात घेण्यात आला.

नमुद दाखल गुन्हयातील संपुर्ण 21 बॉक्स, ॲल्युमिनीयम फॉईल किंमती रुपये 46,82,287/– जप्त करण्यात आला आहे. तपासात नाव निष्पन्न चालक व ईतर आरोपीतांचा शोध घेवून अटक करण्यात येत आहे.

जर सदर गुन्हयातील ॲल्युमिनीयम फॉईल ऐवजी रेतीने भरलेला कंटेनर 'आयएफसी. इंटरनॅशनल फ्रेट कार्पोरेशन' 77, एव्हरग्रिन एव्हेन्यू, ब्रुक लिन न्युयार्क यु.एस.ए येथे पोहोचला असता तर 'हिडांल्को इंन्डस्ट्रीज' लि.मी. या कंपनीची बदनामी झाली असतीच शिवाय देशाच्या प्रतिष्ठा सुध्दा मलीन झाली असती. त्यामुळे श्री. निलेश भरणे, पोलीस उप आयुक्त, परि.क्र.4, नागपूर यांनी असा गंभीर आणि धाडसी गुन्हा करणा–या टोळीचा छळा लावण्यासाठी अजनी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांना सदर गुन्हयाचा अंत्यत गांभीर्य पुर्वक तपासा करण्याचे निर्देश देवून मार्गदर्शन केले. त्याआधारे अजनी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी आपले तपास कौशल्याचा वापर करुन अथक परीश्रमाने वेगवान तपास करुन टोळीचा छळा लावून गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. 4, श्री. निलेश भरणे, सहा.पोलीस आयुक्त, अजनी विभाग, श्री. राजेद्र धामनेरकर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पो.स्टे. अजनी श्री. एच. एल. उरलागोंडावार, पोनि ए.पी. सिद, सपोनि अहिरकर, पोउपनि वाय. व्ही. इंगळे, पोहवा सिध्दार्थ पाटील, शैलेश बडोदेकर, अनिल ब्राम्हणकर, नापोशि भगवती ठाकुर, संजय मनस्कर, मनोज काळसरपे, पोशि आशिष राउत, देवचंद थोटे, दिपक तरेकर, मिथुन नाईक यांनी केली.

## दिनांक 07.01.2019 सोमवार

### 1) गुन्हे शाखा अमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई :

दिनांक 06.01.2019 चे 1620 वा चे सुमारास अमली पदार्थ विरोधी पथकातील कर्मचारी यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे पो.स्टे सक्करदरा हद्यीत प्लॉट क्रं. 84 आझाद नगर मोठा ताजबाग नागपुर येथे सापळा रचुन मिळालेल्या बातमीप्रमाणे दोन ईसम मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 1) जावेद उर्फ बच्चा अताउल्ला खान वय 35 वर्ष रा. प्लॉट नं. 84 आझाद नगर मोठा ताजबाग, नागपुर, 2) अरशद अहमद अशपाक अहमद वय 21 वर्ष रा. प्लॉट नं. 44 वर्ष तोहीद नगर मोठा ताजबाग, नागपुर असे सांगीतले त्यात आरोपी क्रं. 2 अरशद अहमद हा पो.स्टे सक्करदरा येथुन

तडीपार आहे. त्यांना मिळालेल्या माहितीचा मजकुर समजावुन सांगुन दोन पंचासमक्ष एन.डी.पी.एस कायद्यातील तरतुदीचे तंतोतंत पालन करून त्यांची अंगझडती घेतली असता घटनास्थळ जप्ती पंचनामाप्रमाणे दोन्ही आरोपीचे ताब्यातुन एकुण 59 ग्रॅम एमडी(मेफेड्रोन) ड्रग्स पावडर किं. 1,77,000 रू नगदी 100 रू असा एकुण 1,77,100 रू चा मुद्येमाल मिळुन आल्याने तो अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये जप्त करून त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरोधात कलम 21(ब), 29 एन.डी.पी.एस ॲक्ट सह कलम 142 महा. पो.अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

सदरची कारवाई मा.श्री डॉ. भूषण कुमार उपाध्याय, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री रविन्द्र कदम, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर श्री श्री संभाजी कदम, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री संजीव कांबळे, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात वपोनि राजेन्द्र निकम, सपोनि आर.एस. नागोसे, पोउपनि स्वप्नील वाघ, अर्जुनसिंग गौर, पोहवा दत्ता बागुल, तुलसिदास शुक्ला, प्रदिप पवार, नापोशि सतिष पाटील, नितीन साळुंके, नितीन मिश्रा, नरेश शिंगणे, रूबीना शेख, गुन्हे शाखा, नागपुर शहर यांनी केली.

2) पो.स्टे. नंदनवन पोलीसांची कामगिरी :

दिनांक 21.12.2018 चे 1300 वा ते 1700 वा दरम्यान पो.स्टे. नंदनवन हद्यीत जट्टेवार सभागृह, हसनबाग रोड, नागपूर येथे फिर्यादी सचिन सुभाष राव बांगरे, वय 32 वर्ष रा. प्लॉट नं. 834, मिनीमाता नगर, आनंद चौबे शाळेजवळ, कळमणा, नागपूर यांचे बहीणीचे लग्न समारंभाचा कार्यक्रम होता लग्नात आलेले एकुण 2,68,000/—रू. चा मुद्देमाल लग्नसमारंभाचे हॉल चे खोलीमध्ये ठेवला असता कोणीतरी अज्ञात इसमाने हॉलचे खोलीमधील उघड्या दारातुन आत प्रवेश करून सदरचा मुद्देमाल चोरून नेल्या बाबत तक्रार दिल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान लग्नातील व्हिडीओ रेकॉर्डींग तसेच स्मार्ट सिटी येथील सिसिटीव्ही फुटेज तांत्रीक उपकरणाच्या साहयाने यातील महीला आरोपी 1) सौ. विमल संगितबाबु इंगळे, वय 55 वर्ष 2) करण संगितबाबु इंगळे, वय 19 वर्ष दोन्ही रा. कौशल्यानगर कुकडे ले आउट, नागपूर यांना अटक करण्यात आले नमुद महीला आरोपी ही रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार असुन तिचे विरूध्द नागपूर शहरातील विविध पो.स्टेला याच स्वरूपाचे बरेचसे गुन्हे दाखल आहे. सदर महीला रेकॉर्डवरील हार्ड गुन्हेगार असल्याने ती तपासात कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसल्याने पोलीसांनी बुध्दी चातुर्याने व संवाद कौशल्याचा वापर करून तिला बोलते करून तीचे कडुन सदर गुन्हयातील सोन्याचे दागीने व तिचे मुलाकडुन गुन्हयात वापरलेली होंडा युनिकॉन मोटारसायकल असा एकुण कि.अं. 2,10,000/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोहवा संजय साहु करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा. श्री निलेश भरणे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. 4 नागपूर व मा. श्री धामेजवार सहा. पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. विनायक चव्हाण, पोनि. श्री मुकुंद साळुंके (गुन्हे), श्री सपोनि पी.डी. धाडगे, पोउपनि हेमंत थोरात, सपोउपनि रमेश चिखले, पोहवा संजय साहु, नापोशि संदीप गवळी, अतुल चाटे, पोशि चेतन पाटील, प्रविण भगत, अभय मारोडे, मपोशि पुनम सेवतकर, ज्योती डोंगरे सर्व पो.स्टे. नंदनवन नागपूर यांनी केलेली आहे.




दिनांक 09.01.2019 बुधवार

**2) पो.स्टे तहसिल पोलीसांची कामगीरी –**

दिनांक 07.01.2019 रोजी वरीष्ठाचे आदेशाने पो.स्टे एरीयात पेट्रोलींग करीत असतांना सायंकाळी 1730 वा चे सुमारास गार्ड लाईन रोड ने एक इसम कत्था रंगाची टी शर्ट व हिरव्या रंगाचा पॅन्ट परीधान केलेला व त्याच्याकडे कायनेटीक होंडा स्कुटर काळया रंगाची एमएच/31/इ/3466 असे संशयीत रित्या पायदळ ढकलत घेवुन जाताना दिसुन आला तो आम्हाला पाहुन पळुन जात असतांना त्याचा पाठलाग करून स्टाफच्या मदतीने गार्ड लाईन रनींग रूम समोर थांबवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता तो उडवा उडवीचे असमाधानकारक उत्तर देवु लागला त्यास पुन्हा विचारपुस केली असता त्याने आपले नाव मोहम्मद शहजाद उर्फ म्याउ वल्द मो. अजमेर वय 20 वर्ष रा. बल्लारशहा वाटर सप्लायर जवळ कब्रस्थान शेख रसुल यांचे घरी किरायाणे, पो.स्टे चंद्रपुर असे सांगीतले व त्याच्या जवळील कायनेटीक होंडा स्कुटर याबाबत विचारपुस केली असता सदर गाडीचे कागदपत्र मागीतले असता तो असमाधान कारक उत्तर देवु लागला व सदर गाडीबाबत काही कागदपत्र दिले नाही. त्यावर दाट संशय आल्याने स्टॉफच्या मदतीने त्यास ताब्यात घेवुन गाडीबाबत सखोल विचारपुस केली असता सदर गाडी ही त्याने दिनांक 07.01.2019 चे सकाळी 0500 वा चे सुमारास रामझुलाच्या खालुन झेराक्सच्या दुकानाजवळुन चोरली व लपवुन ठेवली होती आता तो विकण्याकरीता घेवुन जात असल्याचे सांगीतले वरून लगेच त्यास पो.स्टे तहसिल येथे अप क्रं. 10/19 कलम 379 भादवि अन्वये गुन्हा दाखल असल्याने त्यास गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कारवाई मा श्री राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त, परी.क्रं. 3 नागपुर शहर, मा.श्री राजरतन बंसोड, सहा. पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात वपोनि वैभव जाधव, सपोनि रामदास पाटील पोहवा प्रमोद शनिवारे, नापोशि सचिन टापरे, टप्पुलाल चुटे, पोशि पुरूषोत्तम जगनाडे, कृष्णा चव्हाण यांनी केली.

**1) पो.स्टे. यशोधरानगर पोलीसांची कामगिरी – खुनाचा गुन्हा अवघ्या 4 तासाचे आत उघड केलेबाबत :**

नियंत्रण कक्ष नागपूर शहर येथुन सकाळी 07.00 वा. सुमारास माहीती मिळाली की, नामदेव नगर, एन.आय.टी. गार्डनसमोरील मोकळया मैदानामध्ये एक इसमाचे प्रेत पडलेले आहे. अशा माहीतीवरून पो.स्टे. यशोधरा नगर येथील स्टाफ घटनास्थळी पोहचुन प्रेताची बारकाईने पाहणी केली

असता प्रेताचे उजवे मनघटाची नस कापुन बाजुला ब्लेड पडल्याचे दिसुन आले तसेच प्रेताच्या उजव्या कपाळावर जखम झाल्याचे दिसुन आले. यावरून सदर इसमाचे खुन झाला असल्याचे दिसुन आले. आजुबाजुला विचारपूस केली असता मृतकाची पत्नी नामे रशमी शेखर पौनिकर, वय 25 वर्षे ही घटनास्थळी रडत आली असता तिचे कडून माहीती मिळाली की, सदर मुतक इसमाचे नाव शेखर रमेश पौनिकर वय 28 वर्षे रा. कुंदनलाल गुप्ता नगर, मोटघरेच्या घरी किरायाने, पो.स्टे. यशोधरा नगर, असे आहे.

मृतकाचा भाऊ हयाने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. अप.क्र. 10/19 कलम 302 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात तपासात मृतकाची पत्नी नामे रश्मी शेखर पौनिकर, वय 25 वर्ष हीला सदर गुन्हयासंबंधाने विचारपूस केली असता तिने पोलीसांना प्रथम मयत हा रात्री जेवण करून फिरण्यासाठी बाहेर गेला. त्यानंतर परत आला नाही असे सांगीतले. त्यावरून पोलीसांना शंका आल्याने तिला महीला कर्मचारी हिचे मदतीने ताब्यात घेवुन सखोल विचारपूस केली असता तीने सांगीतले की, तिचा मृतक पती हा दारू पिण्याचा सवयीचा होता. त्याने घरातील सोन्याचे दागीने, मोटार सायकल, मोबाईल गहाण ठेवले होते व घरात किराणा आणायचा नाही तसेच तिचे वर अनैतिकसंबंधाबाबत शंका घेवुन नेहमी मारपीट करायचा त्यामुळे मयतची पत्नी ही मृतकास मागील दोन महीण्यापासुन जिवे मारण्याची योजना आखत होती.

तिचा फेसबुकव्दारे ओळख झालेला प्रियकर आरोपी नामे प्रज्वल रंजीत भैसारे, वय 21 वर्षे रा. नारी रोड, म्हाडा क्वार्टर, जरिपटका, याचे सोबत मैत्रीचे संबंध 6 महीण्यापुर्वी निर्माण झाले. त्यातुन प्रेम संबंध झाल्याने त्याची मदत घेण्याचे ठरविले.

घटनेच्या 4 दिवसापुर्वी तिने प्रियकरास बोलवुन त्यास भेटुन जिवे ठार मारण्याबाबत योजना आखली. मंगळवारी दिनांक 08/01/2019 रात्री मृतक हा रात्री दारू पिऊन जेवन करून झोपला असता आरोपी पत्नी ने तिचे मोबाईल वरून प्रियकर आरोपीस संपर्क केला व रात्री 02.00 वा. सु. मोटार सायकल व ब्लेड घेवुन येण्यास सांगीतले. प्रियकर आरोपी हा मृतकच्या घरी येवुन मृतकाच्या पत्नीने व आरोपी प्रियकराने मृतकाचा गळा दोरीने आवळुन ठार केले. नंतर आरोपी प्रियकर व मृतकाची पत्नी हया दोघानी नामेदव नगर एन.आय.टी. गार्डन समोरील मोकळया मैदानात नेवुन प्रेत टाकुन तिथे मृतकाचे उजव्या हाताची नस ब्लेड ने कापुन, मोठा दगड मृतकाच्या डोक्यावर मारून नवरा मरण पावल्याची खात्री केल्याने प्रियकर आरोपीने मृतकाच्या पत्नीला तिचे घराजवळ सोडून आपले स्वतःचे घरी निघुन गेला. असे तिने सांगीतले. तिने दिलेल्या माहीतीवरून तिचा प्रियकर प्रज्वल रंजीत भैसारे वय 21 वर्षे रा. नारी रोड, म्हाडा क्वार्टर,जरिपटका, व नमुद आरोपी महीलेस ताब्यात घेण्यात आले.

सदरची कारवाई मा .श्री. हर्ष पोद्दार, पोलीस उपआयुक्त, परि–5, नागपूर शहर, श्री. मा. पी. एम. कार्यकर्ते, सहा. पोलीस आयुक्त, जरिपटका विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पो.नि. पी.जे. रायण्णावर, सपोनि पंकज बोंडसे, पोउपनि उल्हास राठोड, सपोउपनि प्रकाश काळे, विजय राऊत, पो.हवा. दिपक धानोरकर विनोद सोलव, ना.पो.शि. गजानन गोसावी, संतोष यादव, निलेश घायवट, लक्ष्मीकांत बारलिंगे, नरेश मोडक, विजय लांजेवार, पो.शि. रत्नाकर कोठे, आफताब, गणेश, म.पो.शि. रोशनी दहीकर यांनी केली असुन सदर गुन्हा उघडकीस आणला.



2) पो.स्टे. लकडगंज पोलीसांची कामगिरी :

आरोपी शिलनकर रामचंद्र चिमनकर, वय 35 वर्ष रा. बाबुलबन गरोबा मैदान प्लॉट न. 131, पो.स्टे. लकडगंज नागपुर याचे राहते घरून ताब्यातुन किंग नावाचा नायलॉन मांजाच्या एकुण 18 चकरी प्रत्येकी कि.अं. 350/– रू प्रमाणे एकुण 6300/– चा माल विक्री करतांना मिळुन आला. नायलॉन मांजावर विक्री बंदी असतांना सुध्दा तो नायलॉन मांजा विक्री करतांना मिळुन आल्याने त्यांचे वर कलम 5,15, पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 व भादवि कलम 188 प्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाकडुन नायलॉन मांजा विक्री बाबत मनाई आदेश क्रमांक– न. सी.आर.टी. 2018/प्र.क्र. 37/ता. 82 मुंबई दि. 18/06/2016 अन्वये मनाई आदेशाचे उल्लघंन केल्याने नमुद आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करून गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उपआयुक्त राहुल माकनीकर, मा. सहा.पोलीस आयुक्त वालचंद मुंडे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पो.उपनि. पि.जी. गाडेकर, सपोउपनि रवि राठोड, पोहवा दिपक कारोकार, अजय बैस, नापोशि वासुदेव जयपुरकर, राम यादव, फिरोज खाण, पोशि भुषण झाडे, शिवराज पाटील म.पो.शि. रूपाली यांनी केली.

3) पो.स्टे. सक्करदरा पोलीसांची कामगिरी :

दि. 08/01/2019 रोजी पोलीस स्टेशन सक्करदरा येथील मोठा ताजबाग बिट अधिकारी यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराने गांजाच्या मोठया साठवणुकीची माहिती दिली. सदर माहितीची पोलीस स्टेशन सक्करदराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संदीपान पवार यांनी तात्काळ दखल घेवुन पोलीस स्टाफ व पंचाच्या मदतीने लेडीज मदरसा मागील निराला सोसा. आझाद कॉलनी मोठा ताजबाग,नागपूर येथील नादीरा बी अब्दुल मलीक शेख हिचे घरी छापा मारला असता तिचे राहते घरी गांजाचा मोठा साठा व किरकोळ विक्री करीता त्या गांजाचे लहान पॅकेट मध्ये भरण्याकरीता व वजन माप करण्याकरीता वापरण्यात येणारे साहीत्य गांजा विक्रीतुन आरोपींनी मिळविलेली रोख रक्कम मिळुन आली. एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून सपोनि पुनित कुलट यांनी 11 किलो 210 ग्रॅम निव्वळ गांजा, व नगदी 16,700/– रू. व इतर पॅकींग साहीत्य असा एकुण 1,30,660/– रू. चा माल जप्त करून सदर गांजा विक्री करीता नादीरा बी हिस सहकार्य करणारे आरीफ अब्दुल मलीक शेख व रेहान अफजल शेख यांना अटक करण्यात आली. नमुद प्रकरणात

पोलीस स्टेशन सक्करदरा येथे गुन्हा नोंद करून सदर गुन्हयाचा तपास पोउपनि दिगांबर राठोड यांना देण्यात आला. सदर गुन्हयात मोठा ताजबाग परिसरातील मादक पदार्थांचा सरगना आबु उर्फ फिरोज खान याचा सहभाग आहे काय? याबाबत तपास करीत आहे. तपासादरम्यान मोठया गांजा माफीयांचे नावे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर कारवाई मा. श्री.निलेश भरणे पोलीस उपआयुक्त, परि–4, श्री. सरंभळकर सहा. पोलीस आयुक्त, अति.कार्यभार सक्करदरा विभाग नागपुर यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.संदीपान पवार, दु.पो.नि.सुनील चव्हान, सपोनि उल्हास भुसारी, सपोनि पुनीत कुलट, पोउपनि मनोज ओरके, सपोउपनि राजु डांगे, सुनिल पाटील, पोहवा संजय सोनवने, नापोशि आनंद जाजुर्ले, राजेश कावळे, पोशि रशिद शेख, विद्याधर पवनीकर, पवन लांबट, मनोज ढोले, मनापोशि सारीका मिसर, पुष्पा खेडकर, चालक नापोशि सरफराज, धीरेंद्र यांनी केली आहे.

## दिनांक 10.01.2019 गुरूवार

### 1) पो.स्टे. तहसिल पोलीसांची कामगिरी :

दि. 07/01/2019 रोजी मी सकाळी 05.00 वा. ते 7.30 वा.चे सुमारास फिर्यादी नामे अमित ब्रिजमोहन सुसुन्द्रे, वय 26 वर्ष, धंदा खाजगी गाडी चालक, रा. हंसापुरी खदान, खान मस्जीदचे मागे गल्ली मध्ये, नागपुर हे त्यांच्या राहते घराला कुलुप लावून जरीपटका, नागपूर येथे दुध वाटण्यासाठी गेले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे टिनाचे घराचे कुलुप कोंडयासह तोडून त्यांचे घरातील दोन एच.पी. कंपनीचे लाल रंगाचे घरगुती सिलेंडर किं.अं. 4,000/–रू. व एक नोकिया कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल किं.अं. रू. 500/– अशी एकुण किं.अं. 4,500/– रू. ची मालमत्ता चोरून नेली अशी फिर्याद दिलेवरून गुन्हा कलम 454, 457, 380 भा.दं.वि. अन्वये नोंद केला.

सदर गुन्हाचा तपासा दरम्यान आरोपी ईकबाल अहमद वल्द ऐसान अहमद, वय 28 वर्षे रा. भानखेडा छोटी मस्जीद, पो.स्टे. तहसील, नागपूर याचा शोध घेवुन गुन्हयातील 1) एच.पी कंपनीचे घरगुती लाल रंगाचे दोन गॅस सिलेन्डर कि.अं.4000/–रूपये अंदाजे 2) एक नोकिया कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल किं.अं.रू. 500/– रू. 3) एक थ्री व्हिलर काळया रंगाचा ॲटो कमाक एम. एच 31 सी.व्ही 6697 कि.अं 60,000/– अशी एकुण किं.अं. 64,500/– माल जप्त करून सदर गुन्हयात अटक केले.

सदर कामगिरी मा. श्री. राहुल माखणीकर, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. 3, नागपूर, व मा. श्री. राजरत्न बनसोड, सहा. पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी वैभव जाधव, सपोनि रामदास पाटील, पोउपनि साजीद मोवाल, पो.हवा प्रमोद शनीवारे, समीर शेख ना.पोशि सचिन टापरे, टप्पुलाल चुटे, पोशि रंजीत बावणे, पुरूषोत्तम जगनाडे, क्रिष्णा चव्हाण यांनी केली आहे.



## दिनांक 11.01.2019 शुक्रवार

**1) पो.स्टे. लकडगंज पोलीसांची कामगिरी :**

पो.स्टे लकडगंज नागपुर येथे शोध पथक मध्ये कार्यरत असलेले पोहवा श्याम अगुंथलेवार हे त्यांचे पथका सोबत दि. 10/01/2119 रोजी रात्रगस्त पेट्रोलींगवर असतांना त्यांना मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या माहिती वरून मालधक्का रोड ईतवारी रेल्वे स्टेशन चे मागील बाजुच्या रोडवर मोटारसायकल सह उभा असलेल्या इसमास ताब्यात घेऊन त्यास विचारपुस केली त्याने त्याचे नाव मंगेश रमेश चोपडे, वय 30 वर्षे रा. महेश नगर, गल्ली नं. 02 प्रमोद पाटिल यांच्या घरी किरायाणे, ठाकुर आटा चक्की जवळ, पो.स्टे.गिट्टीखदान. असे सांगीतल्या वरून त्यास त्याच्या जवळ असलेल्या मोटारसायकल बाबत विचारपुस केली असता तो असमाधान कारक व उडवा उडवीचे उत्तर देत असल्याने त्यावर दाट संशय आल्याने त्यास पो.स्टे.ला आणुन अधिक विचारपुस केली असता व त्याच्या जवळील असलेल्या गाडी क्रंमाक MH 31, DE 3782 निळया व काळया रंगाची हिरो होंडा पॅशन प्लस चा पो.स्टे. अभिलेखावर पाहनी केली असता पो.स्टे. सदर गाडी संबधाने अप क्र 06/19 कलम 379 भादवि प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे कळुन आल्याने सदर इसमाच्या ताब्यातुन सदर गाडी क्रमाक MH 31, DE 3782 इंजीन नंबर HA10EBAHA07530 एचेचीस नंबर MBLHA10ELAHA05618 किमती अंदाजे 40,000/- रू ची जप्त करून त्यास चोरीच्या गुन्हयात अटक करण्यात आले . आरोपी मंगेश यास विश्वासात घेऊन अधिक विचारपुस केली असता त्याने पो.स्टे.हद्दीतुन अजुन 2 मोपेड गाडया चोरी केल्याचे त्याने सांगीतले व त्यांच्या सांगण्या नुसार सदर गाडयाचा पो.स्टे.च्या अभिलेखावर पाहणी केली असता पो.स्टे. 298/18 कलम 379 भादवि व 328 /18 कलम 379 भादवि प्रमाणे वाहन चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. सदर दोन्ही गुन्हयातील गाडया 1) MH 49, Q 9414 होंडा एक्टीवा काळया रंगाची इंजीन नंबर JF50ET0195871] चेचीस नंबर ME4JF501MDT195299 किमती अंदाजे 30,000/- रू 2) MH 49, AF 2177 होंडा एक्टीवा सिल्व्हर रंगाची इंजीन नंबर ME4JF505EGT400527, चेचीस

नंबर JF505ET400660 किमती अंदाजे 20,000/— रू. असा एकुण किमंत 90,000/— रू मुद्देमाल आरोपी कडुन मेमोंरडम जप्ती पंचनाम्या प्रमाणे हस्तगत करण्यात आला **अश्या प्रकारे लकडगंज पोलीसांनी वाहन चोरा कडुन 3 दुचाकी वाहन हस्तगत करून वाहन चोरीचे 3 गुन्हे ऊघडकीस आणले आहे.**

सदरची कार्यवाही मा. पोलीस उप आयुक्त राहुल माकनीकर, मा. सहा. पोलीस आयुक्त वालचंद मुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खांडेकर याच्या मार्गदर्षनात,पोउपनि पी.जी.गाडेकर, पोहवा श्याम अगथुलेवार, नापोशि पवन भटकर, पोशि अभिषेक शनिवारे पोशि अजय पौनिकर यांनी केली

<u>दिनांक 12.01.2019 शनिवार</u>

<u>(ईतर)</u>

<u>1) पो.स्टे. लकडगंज पोलीसांची कामगिरी :</u>

आरोपी इसम नामे कुणाल अशोक पडोळे, वय 25 वर्षे रा. प्लॉट नं. 601 डी जुनी मंगळवारी, चुना खाय टेकडा, भाजीखाय हनुमान मंदिराजवळ, कोलबा स्वामी सोसायटीच्या आमोरा समोर, पो.स्टे.लकडगंज हा त्यांच्या घरा समोरून नायलॉन माजांची विक्री करीत आहे अश्या मिळालेल्या गुप्त बातमी वरून लकडगंज पोलीसांनी रेड कार्यवाही केली असता सदर इसमाच्या ताब्यातुन MONO KITE FIGHTER MANJHA असे कंपनीचे लेबल असलेले नायलॉन माजांने भरलेल्या 22 चक—या प्रत्येकी चक—या अंदाजे कि. 600/— रू प्रमाणे एकुण 13,200/— रू च्या तसेच I.B.K. GOLD असे कंपनीचे लेबल असलेले नायलॉन माजां ने भरलेल्या 06 चक—या प्रत्येकी चक—या अंदाजे कि. 350/— रू प्रमाणे एकुण 2100/— रू व खरडयाच्या बॉक्स कि.अ. 00.00/— रू च्या असा एकुण 15,300/— रू चा माल विक्री करीता बंदी असलेला नायलॉन माजां मिळुन आला. त्याचेवर कलम 5,15 पर्यावरण संरक्षण अधिनीयम 1986 व कलम 188 भादवि तसेच महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाकडुन नायलॉन माजां विक्री बाबत मनाई आदेश क्रंमाक.—एन.सी.आर.टी. 2018/प्र.क्र.37/ता. 82 मुंबई दि. 18/06/2016 असा मनाई आदेशाचे नमुद इसमानी उल्लघन केल्याने आरोपी विरूध्द पो.स्टे.लकडगंज येथे गुन्हा दाखल करून सदर गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त राहुल माकनीकर, मा. सहा. पोलीस आयुक्त वालचंद मुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खांडेकर याच्या मार्गदर्शनात, पोउपनि पी.जी.गाडेकर, पोहवा श्याम अगथुलेवार, नापोशि पवन भटकर, पोशि अभीषेक शनिवारे, अजय पौनिकर यांनी पार पाडली

<u>2) पो.स्टे. प्रतापनगर पोलीसांची कामगिरी :</u>

पो.स्टे. प्रतापनगर हद्यीत दि. 12.01.19 रोजी तपास पथकाचे कर्मचारी पोस्टे. प्रतापनगर हद्यीत अवैध धदेंवाल्याचे शोधात पेट्रोलिंग करत असतांना गोपनीय माहिती मिळाली की गोविंद सायकल स्टोअर्सचे बाजुला खामला रोड येथे एक इसम अवैधरित्या नायलॉन मांज्याची विक्री करीत आहे अशी माहिती मिळाल्यावरून पोलीसांनी गोविंद सायकल स्टोर्स खामला रोड येथे एका इसमास ताब्यात घेवून त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव अजय लधाराम पंजवानी, वय 30 वर्ष रा. सिंधी कॉलनी प्लॉट नं. 116, पोस्टे प्रतापनगर नागपूर शहर असे सांगितले त्याचेसायकल स्टोअर्स चे दुकानाचे पाहणी दरम्याना सामानाच्याा खाली अडगळीत एका पांढ—या नायलॉन पिशवीत 10 नग मोनो लाईट कंपनीचा व 12 नग किंग कंपनीचा अश्या एकुण 22 नग नायलॉन मांजा वेगवेगळया प्लास्टीक चक्रीत विणलेला प्रत्येकी 500 रू प्रमाणे एकुण 11,000 रू किंमतीचा मुद्येमाल मिळून आल्याने त्याचेवर पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5,15 सह कलम 188 भादवि

तसेच महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाकडुन नायलॉन मांजा विक्रीबाबत मनाई आदेश क्र. सीआरटी 2018/प्रक्र.37/ता. 82 मुंबई दि. 18.06.16 चे मनाई आदेशाचे उल्लघंन केल्याने सर्व मुद्येमाल जप्त करण्यत आला व नमुद इसमाविरूध्द गुन्हा दाखल करून त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. त्याने हा नायलॉन मांजा कोठून घेतला याचा पोलीस शोध घेत आहे.

विशेष म्हणजे हया इसमाने पोलीसांना कळू नये म्हणुन नायलॉन मांजाची बॅग सायकल स्टोर्स मध्ये सामानाच्या आत लपविल्या होत्या व गि—हाईक येईल तसे तो चक्री काढून देत होता.

सदरची कारवाई मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. 1, श्री विवेक मासाळ, व सोनेगाव विभाग सहा.पोलीस आयुक्त, श्री. अशोक सरंबळकर, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. राजेद्र पाठक, सपोनि शिर्के, पोहवा मनोज जोशी, नापोशि चंद्रमणी सोमकुंवर, पोशि विद्याधर बक्षी, धमेद्र यादव, प्रविण फलके, सिध्दार्थ खंडारे यांनी केली आहे.




**दिनांक 14.01.2019 सोमवार**

**1) गुन्हे शाखा, युनिट क्र. 3 पोलीसांची कामगिरी :**

दिनांक 13/01/2019 चे 17:15 वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. रघुनंदिनी सुंदरम रंजन वय 62 वर्षे, रा. प्लॉट नं. 59, शिवाजीनगर पो.स्टे. अंबाझरी, नागपूर शहर या वॉकींग करीत असताना यातील अनोळखी ईसम हा मोटार सायकलवर येवून मोटारसायकल थांबवून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन खेचून चोरून पळून गेला अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. अंबाझरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनीट 3, नागपुर शहर करीत असताना दिनांक 14/01/2019 रोजी तांत्रीक तपास तसेच मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे यातील रेकॉर्डवरील कुख्यात चैन स्नॅचर गुन्हेगार यांस टेकडीवाडी, पो.स्टे. वाडी हद्दीतून ताब्यात घेवून त्याचेकडून गुन्हयातील जबरीने चोरी केलेली फिर्यादीची सोन्याची चैन (सोन्याचे 03 पदकासहित) एकुण 67 ग्रॅम एकुण किं.2,14,400/— रू. हस्तगत करण्यात आली तसेच त्याने गुन्हा करताना वापरलेली होंडा ज्रूपेजमत मो.सा. क्र. MH 27-AP-4501 किं. 50,000/— असा एकुण 2,64,400/— रू. चा मुद्येमाल हस्तगत करून अवघ्या 24 तासाचे आंत गुन्हा उघडकीस आणला.

आरोपी भारत गुरदासमल वासवानी वय 34 वर्षे रा. सिंधु कॉलनी शदानी दरबार जवळ पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर ह.मु. टेकडीवाडी, चवरेचे घरी किरायने, खडगांव रोड, पो.स्टे. वाडी, नागपूर शहर हा कुख्यात राज्यस्तरीय चैन स्नॅचर असून, त्याने महाराष्ट्रातील विविध जिल्हयात

चैनस्नॅचिंग व चोरीचे गुन्हे केलेले आहेत. अमरावती, अकोला, जळगांव व नागपूर शहरात एकुण 21 गुन्हयात तो यापुर्वी अटक झालेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. संभाजी कदम, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जगवेंद्रसिंग राजपुत, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, मपोउपनि मंगला मोकाशे, सपोउपनि राजेंद्र बघेल, पोहवा शैलेष ठवरे, सुरेश हिंगणेकर, अनिल दुबे, नापोशि अतुल दवंडे, श्याम कडू, पोशि शरीफ शेख यांनी केली आहे.




## 2) पो.स्टे. सक्करदरा पोलीसांची कारवाई :

पोलीस स्टेशन सक्करदरा येथील तपास पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फतीने बातमी काढुन सदर माहितीची पोलीस स्टेशन सक्करदराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संदीपान पवार यांनी तात्काळ दखल घेवुन पोलीस स्टाफ व पंचाच्या मदतीने दि 03/01/2019 चे 21.50 वा. चे दरम्यान मौजा बहादुरा येथील शिवमंदिरा समोरील परिसर, पो.स्टे. सक्करदरा, नागपुर 1) पवन अनिल महाजन वय 22 वर्ष रा प्लॉट नं. 38, सरस्वती नगर, उमरेड रोड, बहादुरा, पो.स्टे. सक्करदरा नागपुर, 2) अतुल कोठीराम देवगडे वय 24 वर्ष रा पांढुर्णा, ता. कामठी, नागपुर दि 13/01/2019 चे 12.45 वा. दरम्यान सोहेल पतंग शॉप, सरताज कॉलनी, मोठा ताजबाग, पो.स्टे. सक्करदरा नागपुर येथे आरोपी अब्दुल नईम अब्दुल गनी वय 51 वर्ष रा सरताज कॉलनी, मोठा ताजबाग, पो.स्टे. सक्करदरा नागपुर तसेच दि 13/01/2019 चे 21.53 वा. चे दरम्यान आझाद कॉलनी, प्लॉट नं. 3, मोठा ताजबाग, पो.स्टे. सक्करदरा नागपुर येथे आरोपी जकिर हैदर अली खान वय 28 वर्ष रा आझाद कॉलनी, मोठा ताजबाग, पो.स्टे. सक्करदरा नागपुर यांचे ताब्यातुन आर्थीक फायद्याकरीता शासनाकडुन प्रतिबंधीत असलेल्या नॉयलॉन मांजाची विक्री करीता जवळ बाळगुन मिळुन आल्याने एकुण 10 नॉयलॉन मांज्याच्या चक्र्या एकुण किमंती 5400/– रू. मुद्येमाल हस्तगत करून जप्त करण्यात आला.

सदर कारवाई श्री. निलेश भरणे मा. पोलीस उप आयुक्त, परि – 4, श्री. सरंभळकर सहायक पोलीस आयुक्त, अति. कार्यभार सक्करदरा विभाग नागपुर, तसेच श्री. धामनेरकर सहायक पोलीस आयुक्त, अति. कार्यभार सक्करदरा विभाग नागपुर, यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री संदीपान पवार, दु.पो.नि. श्री सुनील चव्हान, सपोनि उल्हास भुसारी, सपोनि पुनीत कुलट, पोउपनि मनोज ओरके, सपोउपनि राजु डांगे, पोहवा संजय सोनवने, पोहवा अरूण खेरगडे, नापोशी आनंद

जाजुर्ले, नापोशी राजेश कावळे, पोशि पवन लांबट पोशी राशीद शेख, पोशि विद्याधर पवनीकर, पोशि मनोज ढोले, मपोहवा ललीता, मपोशी रोशनी, मपोशि स्मीता, यांनी केली आहे.

3) पो.स्टे. मानकापुर पोलीसांची कारवाई :

दि. 14/01/19 रोजी सपोउपनि ज्ञानेश्वर शेंडे हे दिवसपाळी डयुटी दरम्याण सोबत डी.बी.पथक कर्मचारी सह मंकर संक्रातीचा सनानिमीत्त प्रतिबंधीत नॉयलॉन मांजा विक्री करणारे दुकानदाराचे विरूध्द कारवाही करणेकरीता मा प्रभाकर वि मत्ते पो नि गुन्हे पो स्टे मानकापुर नागपुर शहर यांचे आदेशाने पो स्टे हददीत पेट्रो मोबाईलने पेट्रोलिंग करीत असताना अंदाजे 12.30 वा चे दरम्यान झिंगाबाई टाकळी येथे एका गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, महादेव नावाचा इसम हा आपले हनुमान मंदीरचे बाजुला महाजन कॉम्प्लेक्स समोर श्रीताज जनरल स्टोर्स येथे नॉयलॉन मांजा विक्री करीत आहे अशा माहीतीवरून सोबत स्टाफसह दिलेल्या पत्यावर जावून दुकानाचे मालकांना दुकान पाहणी करण्याचे कारण सांगुन त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव महादेव विठोबाजी राउत वय 57 वर्ष रा. प्लॉट नं 18 डोये ले आउट गितानगर मतीमंद शाळेजवळ झिंगाबाई टाकळी नागपुर असे सांगीतले. व त्याचे दुकानाची झडती घेतली असता एका निळया रंगाच्या प्लास्टीकच्या बोरीत 1) सुपरहिरा काईट कंपनीचा मांजा 7 नग प्रत्येकी किं अंदाजे 300 रू चा असा एकुण 2100 रू चा व 2) मोनोकाईट कंपनीच्या 2 नग प्रत्येकी किंमती अंदाजे 600रू असा एकुण 1200 रू चा असा एकुण 9 नग वेगवेगळया रंगाचा किंमती अंदाजे 3300 रू चा प्रतिबंधीत नॉयलॉन मांजा मिळुन आल्याने जप्त करून सिलबंद करण्यात आले. नमुद आरोपी विरूध्द पो स्टे मानकापुर येथे कलम 5, 15 पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 व कलम 188, 290 भादवि तसेच महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाकडुन नॉयलॉन मांजा विक्री बाबत मनाई आदेश क्रं सिआरटी 2018/प्र क्रं 37/ता 82 मुंबई दिनांक 18/06/16 अशा मनाई आदेशाचे उल्लंघन गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कार्यवाही मा. पोलीस उप आयुक्त साो. परि. क्रं. 2,नागपुर शहर, श्री चिन्मय पंडीत, सहा. पोलीस आयुक्त सदर विभाग श्री मराठे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश चव्हाण, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रभाकर मत्ते यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गजेंद्र राउत, सपोउपनि ज्ञानेश्वर शेंडे, विजय नाईक, नापोशि संतोश राठोड, राजेश वरठी, पोशि हितेश फरकुंडे, राघोजी चिलगर, मपोहवा सुषमा तिनघसे यांनी केली.

## दिनांक 17.01.2019 गुरूवार

## (ईतर)

1) गुन्हे शाखा, युनिट क. 3 पोलीसांची कामगिरी :

दिनांक 04.01.19 चे 2015 वा ते दिनांक 05.01.19 चे 1100 वा दरम्यान फिर्यादी मोहित हरबस खुराना, वय 30 वर्ष रा. प्लॉट नं. 124, सतनामी नगर, एनआयटी ग्राउडजवळ, पो.स्टे. लकडगंज, नागपूर हे आपले टायरचे शोरून व गोडवून ला कुलूप लावून बंद करून नोकरासह घरी निघून गेले दुस—या दिवशी नोकर शोरूम व गोडावून चे कुलूपाची चाबी फिर्यादीचे धरून घेवून गोडावून उघडण्याकरीता आले असता नोकराला गोडाउनचे षटरला लावलेले कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी याबाबत फिर्यादीला माहिती दिली. फिर्यादी हे घटनास्थळी येवून गोडावून मधील टायरची मोजणी केली असता त्यांनी गोडावून मध्ये ठेवलेल्या एकुण 80 वेगवेगळया कंपनीचे टायर पैकी एकुण 41 नग टायर किं. 6,54,000 रू चा मुद्येमाल दिसून आला नाही गोडावून मध्ये लागलेल्या सिसीटीव्ही ची पाहणी केली असता तीन अज्ञात इसम गोडावून मधुन टायर नेत असल्याचे दिसुन आले. वरून अज्ञात आरोपीतांविरूध्द वेगवेगळया कंपनीचे एकुण 41 टायर किंमती एकुण 6,54,000 रू चे चोरून असल्याबाबतची तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट क्र. 3, कडुन करण्यात आला. गुन्हयाचा तपासात सिटी ऑपरेटिंग सेटर नागपूर येथे जावून पाहणी केली असता घटनेच्या वेळेनंतर एक संशयित ट्रक नागपूर कडुन भंडारा रोड कडे जातांना दिसला त्यावरून पुढील टोल नाक्यावरील सिसिटीव्ही फुटेज चेक केले असता नमुद ट्रकचा नंबर आरोपीतांनी टोल नाक्यावर जो नोंदविला त्यानंबर बाबत खात्री केली असता तो नंबर एक दुचाकी वाहनाचा असल्याचे निष्पण झाले, त्यामुळे सदर ट्रकबाबत आणखी संशय आल्याने वरिष्ठाच्या आदेशाने तपासात आणखी पुढे जावून महाराष्ट्र व मध्यप्रदेश सिमेवरील खवासा आरटिओ चेक पोस्ट कार्यालयात जावून संशयित ट्रक बाबत अधिक तपास केला असता दहाचाकी ट्रकचा क्रमांक युपी/21/बीएन/6003 असा निष्पन्न करण्यात आला. नमुद ट्रक हा उत्तर प्रदेश येथील असुन ट्रक मुद्येमालसह उत्तर प्रदेश येथे गेल्याचे माहिती प्राप्त झाल्यावरून स्टाफसह उत्तरप्रदेश बरेली या ठिकाणी जावून अत्यंत शिताफिने आरोपींचा माग काढुन ट्रक व मुद्येमालाबाबात अधिक तपास करण्यात आला.

गुन्हयात आरोपी क्र 1) मो. तौसिब उर्फ बाबु मो. साबिर, वय 26 वर्ष रा. बहेडी, जि. बरेली, पोस्टे. बहेडी, उत्तर प्रदेश 2) कफिल अहमद अकील अहमद, वय 34 वर्ष रा. बहेडी जि. बरेली पोस्टे दुरनिया, उ.प्र. 3) खतीब हमद रफिक अहमद, वय 42 वर्ष रा. बहेडी जि. बरेली, उ.प्र. 4) मो. शाकीर मो. जुम्मा वय 36 वर्ष रा. बहेडी जि. बरेली. उ.प्र. गुन्हयातील आरोपी यांचे ताब्यातून एकुण 40 नग टायर वेगवेगळया कंपनीचे एकुण 6,54,000 रू. 2) दहा चाकी टाटा कंपनीचा ट्रक क्र. युपी. 21/बीएन/6003, कि. 10,00,000 रू चा मुद्येमाल असा एकुण 16,54,000 रू चा मुद्येमाल नागपूर येथे परत येवून आरोपीतांना अटक करून विद्यमान न्यायालयाकडुन आरोपीतांचा पीसीआर प्राप्त करण्यात आला अटक आरोपी हे आंतरराजीय टोळीचे सदस्य असुन त्यांच्यावर पंजाब, बिहार राजस्थान व कनोज उत्तरप्रदेश अशा विविध राज्यात चोरीचे गुन्हे दाखल आहे. यापुर्वी आरोपीतांना पंजाब राज्यातील पटियाला न्यायालयातून 5 वर्षाची शिक्षा करण्यात आली आहे. तसेच नमुद आरोपी कनोज उत्तरप्रदेश आणिी बिकानेर राजस्थान येथील गुन्हयाच्या संदर्भात संदर्भात या पुर्वी जेलमध्ये बंद होते. आरोपीतांकडे इतर गुन्हयाबाबत अधिक तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, (डिटेक्शन) श्री. संभाजी कदम, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जग्वेद्रसिंग राजपुत, सपोनि योगेश चौधरी, पोउपनि माधव शिंदे, पोहवा रफिक खान, शैलेश पाटील, विठ्ठल नासरे, अरूण धर्मे, नापोशि दयाशंकर बिसांद्रे, राकेश यादव, हरीष बावणे, पोशि विकास पाठक यांनी केली आहे.



2) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगिरी :

पो.स्टे. पाचपावली हद्यीत दि. 16.01.19 चे 0030 वा पो.स्टे. हद्यीत आरोपी सर्चिंग कारवाई करीता तपास पथक हे हजर असतांना वैशालीनगर दयानंद पार्क ग्राउड मधील हनुमान मंदीराचे भिंती बाजुला अंधारात पोस्टे. पाचपावली हद्यीत काही इसम दरोडा टाकण्याचे तयारीत आहे अशी खात्रीशिर गोपनिय माहिती मिळाल्यावरून सदर घटनास्थळी पाचपावली पोलीस स्टॉफ रवाना होवून सदर ठिकाणी चपळाईने रेड कारवाई केली असता सदर ठिकाणी 5 इसम हे दरोडा टाकण्याचे तयारी करती असतांना मिळून आल्याने त्यांना जागीच घेराव घालुन ताब्यात घेवून त्यांचे नाव पत्ते विचारले असता 1) परमजितसिंग उर्फ जेंटील सरदार गुरूचरणसिंग लोहिया, वय 36 वर्ष रा. सुजातानगर सागर बियर बार समोर पोस्टे पाचपावली नागपूर 2) प्रणय उर्फ गोलू सुधाकर पाटील, वय 25 वर्ष रा. सुजातनगर धम्मदीप बौध विहार समोर पोस्टे. पाचपावली नागपूर 3) किशोर बंडु सहारे वय 26 वर्ष रा. बाळाभाउ पेठ गनोबावाडी पोस्टे पाचपावली नागपूर 4) राहुल रामस्वरूप असज्जा उर्फ डोंगरे वय 22 वर्ष रा. लष्करीबाग मिरची कांप जवळ पोस्टे पाचपावली नागपूर 5) पारस गोपाल बाथो, वय 21 वर्ष रा. तांडापेठ चंद्रभागा नगर दत्तमंदीर जवळ पोस्टै पाचपावली नागपूर असे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन 1) एक देशी बनावटी कट्टा कि. 5,000 रू व दोन जिवंत काडतुस कि. 1,000 रू असा एकुण 6,000 रू 2) एक लोखंडी लहान तलवार कि. 300 रू 3) एक लोखंडी हत्तीमार चाकु कि. 250 रू 4) एक लोखंडी भाल्याचा पाता कि. 200 रू 5) एक लोखंडी हत्तीमार चाकु 250 रू मिळॅन आल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे पाचापावली येथे अप. क. 42/19 कलम 399,402 भादंवि सहकलम 3,25, 4,25 भाहका सहकलम 142,135 मपोका अन्वये गुन्हा दाखल करून नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. 3, श्री. राहुल माकणीकर, सहा. पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग, श्री. वालचंद्र मुंडे, यांचे मार्गदर्शनात पोस्टे पाचपावलीचे वपोनि श्री. अशेक मेश्राम, पोउपनि धेगडे, पोहवा चिंतामण डाखोरे, विजय यादव, नापोशि राजेश देशमुख, गजानन निशितकर, रविशंकर मिश्रा, विलास चव्हाण, विश्वास बलांदे, विजय जाने, पोशि सुनिल वानखेडे, महेश जाधव यांनी केली आहे.

दिनांक 18.01.2019 शुक्रवार

2) पो.स्टे शांतीनगर पोलीसांची कामगीरी :

दिनांक 17.01.2019 चे 2100 वा ते 18.01.2019 चे 1000 वा दरम्यान पो.स्टे शांतीनगर येथील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे पो.स्टे हद्यीत अभिलेखावर पाहीजे असलेले आरोपी चेक करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने माहिती दिली की पो.स्टे शांतीनगर येथे दाखल अप क्रं. 83/18 कलम 419,392,34 भादवि मध्ये पाहीजे असलेला आरोपी किशोर सोलंकी हा जुना कामठी रोड शनि मंदीर जवळील देशी भट्टी समोर आहे अशा माहीती वरून त्यास योजनाबध्द रितीने सापळा रचुन त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव किशोर नाथुलाल सोंलकी वय 20 वर्ष, रा. जुना कामठी रोड शनिमंदीर जवळ तुलसी नगर श्रावणी किराणा स्टोअर्स च्या मागे पो.स्टे कळमना असे सांगीतल्याने त्यासा पो.स्टे ला आणुन अधिक विचारपुस केली असता सदर आरोपीने पो.स्टे शांतीनगर अप क्रं. 83/18 कलम 419,392,34 भादवि गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आले तसेच पो.स्टे तहसील अप क्रं. 453/2018 कलम 420,34 भादवि चा गुन्हा केल्याचे कबुली दिली

पो. स्टे शांतीनगर अप क्रं. 83/18 कलम 419,392,34 भादवि व पो.स्टे तहसिल अप क्रं. 453/2018 कलम 420,34 भादवि मधील पाहीजे असलेला आरोपी नामे किशोर नाथुलाल सोलंकी हा गेल्या 4 महीणे पासुन पाहीजे असलेला फरार आरोपी यास अटक करण्यात आली.

सदरची कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त, परी क्रं. 3 श्री राहुल माकणीकर, सहा. पोलीस आयुक्त, लकंडगंज विभाग श्री वालचंद मुंडे, वपोनि श्री मुख्तार शेख, पो.स्टे शांतीनगर यांचे मार्गदर्शनात सपोउपनि सुधीर बघेल, पोहवा अब्दुल वकील शेख, नापोशि गयाप्रसाद वर्मा, पोशि पवन जाधव, चालक पोशि पंकज पराते यांनी केली.



**दिनांक 24.01.2019 गुरूवार**

**1) परि. क. 4 पोलीसांची कामगिरी – मा. न्यायालयाने कलम 82 प्रमाणे उद्‌घोषित करण्यात आलेला जाहीरनामा आदेशात 30 वर्षानंतर अटक :**

नागपुर शहरात विविध गुन्हयात आरोपीतांनविरूध्द कलम 299 जाफौ अनवये आरोपीपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात येते. परंतु गुन्हयात अटक न झालेले आरोपी हे न्यायालयात आरोपपत्र सादर झाल्यानंतर सुध्दा आरोपी हे मा. न्यायलयात हजर राहत नाही. तसेच ते आपला पत्ता व नाव बदलुन किंवा मुळ वास्तव्याचे पत्ता बदलुन अन्य वास्तव्य करित असतात आणि फरारी राहत असतात अश्या प्रकारचे बरेच आरोपीत इसम हे नागपुर शहरामधुन अद्यापही फरारी आहे. त्यांना अटक करून मा. न्यायालयासमक्ष हजर करून फरारी असलेले आरोपीतांना जेरबंद करून त्याच्या मुसक्या आवळण्याकरिता पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. 4 चे विशेष पथक तयार करण्यात आलेले असुन त्या पथकामधील अधिकारी व कर्मचारी यांनी शासकिय व निम शासकीय कार्यालयाकडुन माहीती गोळा करून यावर आपले बुध्दीकौशल्याचा वापर करून खालील नमुद आरोपीतांचा शोध करून त्यांना जेरबंद करून त्याच्या मुसक्या आवळण्यात आलेले आहे.

| अ. क्र | आरोपी नाव | अप क्र. व कलम | प्रकार | | कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पंढरी वल्द बळीराम दोनोडे वय 42 वर्ष रा. गुरूदेव नगर | कलम 325,34 भादवी आरसी न. 80/1981 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | चौकशी अति पो.स्टे. कळमना येथे मर्ग दाखल आहे. | 38 वर्षानंतर शोध प्राथमिक माहीती दि. 24/01/19 त्याचा पुतण्या यांनी कळविले |
| 2 | सुखदेव लहानुजी चुटे वय 22 वर्ष रा. गुरूदेव नगर | कलम 325,34 भादवी आरसी न. 80/1981 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | मरणपावला | 38 वर्षानंतर मृत्युप्रमाण पत्र प्राप्त करण्यात आले |
| 4 | दिनेश उर्फ दिन्वा | अप क्र. | कलम 299 | मरणपावला | मृत्युप्रमाण पत्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शामराव वाघमारे वय 20 वर्ष | 362/1994 कलम 324, 379, 461, 511,394 | जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | पो.स्टे. इमामवाडा येथे खुन दाखल आहे. | प्राप्त करण्यात आले |
| 5 | राजकुमार कुसोबा अंबादे रा. रामबाग | अप क. 362/1994 कलम 324 ,379,461 ,511,394 | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | अटक | तब्बल 26 वर्षानंतर अटक |
| 6 | नितेश उर्फ विवके ताराचंद गणवीर नवीन नाव–नितेश विवके बांगडे रा मोठा इंदोरा पो.स्टे. जरीपटका | अप क. 122/2001 कलम 363,366 भादवी दोघांचे आधारकार्ड प्राप्त करण्यात आलेले आहे. | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | दि. 17/03/2003 ला आरोपीस अअक करून जिलहा सत्र ल्यायालय येथे केस वर्ग करण्यात आली | तब्बल 16 वर्षानंतर याचे नाव मा. कोर्टातुन चौकशी व शोघ घेवुन नाव कमी करण्यात आले आहे. |
| 7 | रमेश गोविंदराव टेकाम वय 52 वर्ष बिडीपेठ पो.स्टे. सक्करदरा | आरसी न. 43/1989 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 28/12/2018 रोजी अटक | तब्बल 30 वर्षानंतर अटक |
| 8 | शेख नजीम शेख मुबारक वय 63 वर्ष रा. मोठा ताजबाग | 296/1986 कलम 326 भादवी आरसी न. 391/03 जुना 34/87 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 15000/ कॅश सेक्यरिटीवर रिहा | तब्बल 33 वर्षानंतर अटक |
| 9 | जाकीर हुसेन वल्द शब्बीर हुसेन वय 38 वर्ष | 115/2005 कलम 324,34 भादवी | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | मरणपावला | तब्बल 14 वर्षानंतर अटक हा लावारीस मर्ग दाखल असुन चौकशी सुरू आहे. |
| 10 | रशीद उर्फ हांडया वल्द शेख बशीर वय 38 वर्ष रा. हसनबाग | 115/2005 कलम 324,34 भादवी | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | मरणपावला | तब्बल 14 वर्षानंतर मृत्यु प्रमाणपत्र प्राप्त केले |
| 11 | नरेन्द्र उर्फ न–या नामदेवराव नांदुरकर वय 25 वर्ष रा. वाठोडा | 298/2016 कलम 336,504,323,144, 146,147 भादवी | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | 22/01/2018 रोजी अटक | तब्बल 03 वर्षानंतर अटक |
| 12 | अशोक गजाननराव | सी.सी.न. | कलम 82 | 23/01/2019 | तब्बल 27 वर्षानंतर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बावणे | 28/1989 कलम 380 भादवी | प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | रोजी मृत्यु प्रमाणपत्र प्राप्त केले | मृत्यु प्रमाणपत्र प्राप्त केले |
| 13 | मुन्ना राजेश श्रीराम खंडेलवार वय 55 वर्ष रा. विश्वकर्मानगर | अप क. 392/1988 कलम 380 भादवी | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 23/01/2019 रोजी अटक | तब्बल 25 वर्षानंतर अटक |
| 14 | राजु भगवानजी लांजेवर रा. सक्करदरा | 250/1986 कलम 392,34 भादवी | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 08/11/1992 मरणपावला | तब्बल 27 वर्षानंतर मृत्यु प्रमाणपत्र प्राप्त केले |
| 15 | मनसिंग न्थ्थुसिंग सेंगर वय 18 वर्ष रा. लाडीकर ले आउट पलॉट न. 32 | आरसी नं 60/1983 कलम 325,436,427 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 29/03/1990 मरणपावला | तब्बल 36 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त करून चौकशी सुरू आहे. |
| 16 | राजेन्द्र उर्फ राजेन्द्र गोपाल नायडु वय 20 वर्ष रा. आझाद कॉलीनी<br>जुना पत्ता – काटोल रोड सी.पी डब्लु कॉलोनी सेंटर पॉइंट शाळेच्या बाजुला<br>नवीन पत्ता– सातपुडा बार च्या मागे हिदुस्थान गोडावुन चे समोर खरबी स्वताहाचे घर पो.स्टे.नंदनवन | आरसी नं 419/1989 कलम 325,34 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 02/07/2008 जे.जे. कॉर्नर ऑफ मुबई येथे मरण पावला | तब्बल 30 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त करून चौकशी सुरू आहे. |
| 17 | प्रमोद गोपाल नायडु वय 25 वर्ष | आरसी नं 419/1989 कलम 325,34 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 29/09/1992 मरणपावला | तब्बल 30 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त करून चौकशी सुरू आहे. |
| 18 | विजय सोमाजी देशमुख रा. रघुजिनगर क्वा/. 93/3 | आरसी नं 20/1989 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 03/12/2008 मरणपावला | तब्बल 30 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त करून मा. कोर्टासमक्ष अहवाल सादर करण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आला. |
| 19 | खुशाल नामदेव इंगोले वय 45 वर्ष रा. गाडीखाना | अप क्र. 317/1986 कलम 380,34 भादवी | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | सन 2016 पासुन मिसींग आहे. | तब्बल 27 वर्षानंतर मृत्यु प्रमाणपत्र प्राप्त केले |
| 20 | राजु रामभाउ उराडे रा. रेशीमबाग मट्टीपुरा | अप क्र. 317/1986 कलम 380,34 भादवी | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 27/06/2010 मरणपावला | तब्बल 33 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त करून चौकशी सुरू आहे. |
| 22 | अशोक मधुकर येरपुडे रा. पवनी नवीन पत्ता– हुडकेश्वर म्हाळगीनगर,उदय चौकामागील परीसर | अप क्र. 304/2015 कलम 420,34 भादवी आरसी न. 4458/17 दि. 04/12/17 | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | 27/06/2015 मरणपावला | तब्बल 33 वर्षानंतर मृत्युप्रमाणपत्र प्राप्त केले ऑक्टोबर 2018 रोजी अभिलेखावरून कमी केले |
| 23 | सचिन रूपचंद वासनिक रा. जयदुर्गानगर पारडी भाडेवाडी पो.स्टे. कळमना | अप क्र. 238/2013 कलम 143,147,149,336, 427,504 भादवी आरसी न. 7939/14 दि. 01/04/14 | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | 27/09/2018 जेल दाखल | तब्बल 06 वर्षानंतर प्रोडक्शन वॉरट घेवुन गुन्हयात अटक करून जेल दाखल |
| 24 | संतोश मुलचंद अहिरकर रा. पो. स्टे. कळमना | अप क्र. 318/2015 कलम 379,34 भादवी आरसी न. 1852/16 दि. 28/04/16 | कलम 299 जाफौ प्रमाणे पाहीजे असलेला | 16/10/2018 3000/– कॅश सेक्यरिटी वर रिहा | तब्बल 03 वर्षानंतर पो.स्टे. नंदनवन अभिलेखावर येथे 8 गुन्हे दाखल आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 25 | रूपचंद उर्फ भु—या नागो सहारे वय 30 वर्ष रा. रामबाग नवीन पत्ता — जुनोना सावरगाव दुरक्षेत्र ता. नरखेड | आरसीसी न. 26 / 1983 | कलम 82 प्रमाणे जाहीरनामा प्रकीया | 16 / 10 / 2018 3000 / — कॅश सेक्यरिटी वर रिहा | तब्बल 35 वर्षानंतर नागपुर शहर अभिलेखावर येथे 18 गुन्हे दाखल आहे. तसेच पो.स्टे. इमामवाडा येथे कलम 176 / 1989 च्या गुनहया मा. कोर्टाने कलम 82 नुसार फरार |

सदर कारवाई पोलीस उप आयुक्त, परि. क. 4, श्री. निलेश भरणे, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री संदीपान पवार, पोहवा विलास चोबितकर (फरार / पाहीजे / जाहीरनामा शोधपथक प्रमुख) यांनी केली आहे.

**2) गुन्हे शाखा, युनिट क. 1 पोलीसांची कामगिरी :**

गुन्हे शाखा युनिट क 1, नागपूर शहर चे अधिकारी व कर्मचारी यांना मिळालेल्या गुप्त माहीतीवरून आरोपी क.1) विशाल सुनिल रामटेके, वय 23 रा सुरेंद्रगढ बजरंग चौक, पो स्टे गिट्टीखदान 2) कपिल लोकेश डोंगरे, वय 20 रा टी व्ही टॉवर, मानवता नगर झोपडपट्टी पो स्टे गिट्टिखदान यांना आज दि 24.01.2019 रोजी ताब्यात घेवून त्याचेंकडून एकूण 5 चोरीच्या मोटारसायकल एकूण 2,75,000 / — रू किंमतीचा मुद्येमाल जप्त केला आहे.

सदरची कारवाई मा पोलीस उपायुक्त (डिटेक्शन), श्री संभाजी कदम, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा नागपुर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप भोसले, सहा. पोलीस निरीक्षक गोरख कुंभार, राजकुमार देशमुख, सपोउपनि राजेंद्र शेंगर सुनिल चौधरी, पोहवा अमित पात्रे, नापोशि राहुल इंगोले, पोशि संदिप मावलकर, निलेश वाडेकर, सर्व नेमणुक गुन्हे शाखा युनिट क 1 नागपूर शहर यांनी केली आहे.